# शुभारंभ

कु. नालंदा चंद्रकांत काजरेकर



BVBK-0403648

रजि नं. ८९७०२/वाचनालय

बालकविता संग्रह

बा.वा.
३६४८
६/३/२०००

म.ग्रं.सं. वाचनालय, ठाणे
विषय : बा.वा.
दा. क्र. : ३६४८

# शुभारंभ

३६४८
बा.वा.
६/३/२०००

नालंदा चंद्रकांत काजरेकर

BVBK-0403648

अंजनी प्रकाशन, पुणे ३७

प्रकाशक
अंजनी अनंत बुरटे
अंजनी प्रकाशन,
प्लॉट नं. ९३, महेश सोसायटी,
गणपती मंदीर मागे, बिबवेवाडी, पुणे ३७.

●

© लेखकाधीन

●

प्रथमावृत्ती : विजयादशमी १९ ऑक्टोबर १९९९

●

मुखपृष्ठ
आनंद नाखरे

●

मुद्रक
स्मिता प्रिंटर्स
नागनाथ पाराजवळ, सदाशिव पेठ,
पुणे ४११०३०.

●

अक्षरजुळणी
काशिनाथ वि. शिगवण
अक्षरवेल
सी/१८, प्लॉट नं. ५७२, दत्तवाडी, पुणे ३०.

●

ISBN - 81-87028-06-8

●

किंमत १५/- रुपये

---

- महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळाने या पुस्तकास अनुदान दिलेले असले तरी या पुस्तकातील लेखकाच्या विचारांशी मंडळ व राज्य शासन सहमत असेलच असे नाही.
- या पुस्तकाच्या प्रकाशनार्थ महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळाच्या नवलेखक अनुदान योजनेत अनुदान मिळाले आहे.

*माझे परमपूज्य आजोबा*
*कै. हरिश्चंद्र गणू उर्फ बाबा काजरेकर*
*यांच्या प्रवित्र स्मृतीला अर्पण*

तुमची नात
नालंदा

## ।। मनोगत ।।

माझ्या आई वडीलांनी मला काही लहान मुलांची गीते, गाण्यांची पुस्तके, बडबड गीते आणून दिलेली होती. सदर गाणी पाठ करून आम्ही नेहमी गमतीने म्हणत असू. मी व माझी छोटी बहीण एकमेकांशी बोलताना किंवा सांगताना गाण्यांच्या गमतीने बोलत असू. त्यामुळे आमचे बोलणे कवितेच्या चालीवर होत असे. असे करता करता काही वेळा सहज एखादी छोटी कविता तयार होत असे. आम्हाला याची काही कल्पना नव्हती. आई वडीलांनी सांगितल्या प्रमाणे सदरचे गाणे आम्ही वहीवर गमतीने लिहीत असू.

त्यानंतर सन १९९७ मध्ये अक्षरसिंधू साहित्य कला मंच सिंधुदूर्ग या साहित्य संस्थेने लहान मुलांसाठी वासंतिक काव्योत्सवाचे औचित्य साधून काव्य स्पर्धा आयोजित केली होती. सदर स्पर्धेसाठी त्यातील एक कविता मी पाठविलेली होती. त्या कवितेस मला पहीले बक्षिस मिळाले. सदर काव्यसंमेलनास कविवर्य मा. मधु मंगेश कर्णिक साहेब हे अध्यक्ष व प्रमुख पाहुणे म्हणून कविवर्य मा. गंगाधर महांबरे साहेब उपस्थित होते. त्यांचे हस्ते माझा प्रशस्तीपत्र व पुरस्कार देऊन गौरव केलेला होता. सदर दोन्ही कविवर्यांनी माझ्या कवितेच्या प्रती मागून घेतल्या व मला शाबासकी दिली. त्यामुळे मला कविता करणेस अधिक प्रोत्साहन मिळाले.

'विठू नाम गाता गाता' या ना. शि. परब यांच्या कविता संग्रहास मा. कविवर्य गंगाधर महांबरे साहेब यांनी प्रस्तावना दिलेली आहे. सदर प्रस्तावनेत माझी एक कविता देवून त्यांनी, अशा कविता कोकणातील कविना तसेच महाराष्ट्राच्याच नव्हे तर भारताच्या नकाशावर ठळक स्थान देतील असा गौरव करून आशावाद व्यक्त केलेला आहे. सदर प्रस्तावनेतील कविते संदर्भात कोकणातील अनेक नव कविवर्यांनी मला अभिनंदनाची पत्रे पाठवून अभिनंदन केले असून आणखी

कविता लिहणेस प्रवृत्त केले. त्यांचे प्रेरणेमुळेच माझा 'शुभारंभ' हा पहिला कविता संग्रह प्रकाशित होत आहे.

अशा कवितांचा संच तयार झाल्यानंतर महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळ, मुंबई यांचेकडे नवलेखकांच्या पुस्तकांच्या प्रकाशनार्थ पाठविले. महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळाने माझ्या कविता संग्रहास अनुदान देवून प्रकाशनार्थ पाठविले याबद्दल मी मंडळाची अत्यंत आभारी आहे. तसेच अंजनी प्रकाशन, पुणे या प्रकाशन संस्थेने प्रकाशनाचे काम केले असून त्यांचीही मी ऋणी आहे. तसेच मला प्रोत्साहन देणारे कविवर्य मा. मधुमंगेश कर्णिक साहेब, मा. कविवर्य गंगाधर महांबरे साहेब, तसेच पुण्याच्या डॉ. नयन कुलकर्णी, अक्षरसिंधु साहित्य कला मंच, सिंधुदूर्ग तसेच कोकणातील अन्य कवि, आई वडील यांच्या प्रोत्साहनामुळेच माझा पहिलाच 'शुभारंभ' हा कविता संग्रह प्रसिद्ध होत आहे. याबाबत मी सर्वांची ऋणी आहे.

'हरीनिकेतन'
कुडाळ

**– कु. नालंदा चंद्रकांत काजरेकर**

## अनुक्रमणिका


| अ.क्र. | कवितेचे नांव | पान नं. |
|---|---|---|
| १ | रविवार | ७ |
| २ | पाऊस | ८ |
| ३ | चिमणीचे घरटे | ९ |
| ४ | मोर | १० |
| ५ | युनिफॉर्म | ११ |
| ६ | परीची गोष्ट | १२ |
| ७ | खेळ आमचा रंगायचा | १३ |
| ८ | कोल्होबाचे वैर | १४ |
| ९ | आपण कोण | १५ |
| १० | चिंगीचा सल्ला | १६ |
| ११ | चिमणीचे बाळ | १७ |
| १२ | चांदोबा | १९ |
| १३ | हत्तीदादाचे शेपूट | २० |
| १४ | दादाने काढला हत्ती | २१ |
| १५ | पाऊस | २२ |
| १६ | खार | २३ |
| १७ | कपीला | २४ |
| १८ | काव काव कावळेदादा | २५ |
| १९ | मनीचा बाळ | २६ |
| २० | पहीले बक्षीस | २७ |
| २१ | पुस्तकातला राजा | २८ |
| २२ | माझे दप्तर | २९ |
| २३ | बेडूकदादा | ३० |
| २४ | ससा | ३१ |
| २५ | परिक्षा | ३२ |

# १. रविवार

आई गेली मिटींगला
बाबा गेले क्लबला
रविवारी सुद्धा
ताईच माझ्या सोबतीला.

कपड्यांचा ढीगारा धुवून
भांड्याचा पसारा आवरून
ताई जाते पाण्याला
विसरली माझ्या नाष्ट्याला.


खेळून खेळून मी दमले
खाऊ शोधायला आले
आईचे शॉपिंग झालेच नव्हते
लाडू घरात आलेच नव्हते.

पाय आपटत दणादण
ताईकडे मागितले जेवण
ताई म्हणाली थांब हं
टाकते भाताला आंधण.

तिने दिले एक पुस्तक
म्हणाली बाळा वाचत बस
गोष्टीत भेटली एक आई
तिने ऐकवली अंगाई.



# २. पाऊस



आकाशात आले
काळेकाळे ढग
वाऱ्याची सुरू झाली
धावपळ.

जमिनीवर उठले
धुळीचे वादळ
ढगातील वीज
करू लागली लख लख.

समोरच्या अंगणात
झाडांचा धिंगाणा
ढगाला आता
पाण्याच्या भार आवरेना.

टपटप करत
कोसळला पाऊस
पावसात भिजायला
आम्ही सारे खुश.

## ३. चिमणीचे घरटे



अंगणातल्या झाडावर
चिमणीचे घरटे
पानांच्या आडोसाला
वाऱ्यावर डोलते.

रोज सकाळी उठून
मी घरट्यापाशी जाते
पिल्ले झोपलेली पाहून
दाणे परतून आणते.

चिमी आमची विचारायची
दाणे केव्हा घालायचे
आई म्हणायची चिमे त्यांना
दाणे नाही आवडायचे.


एके दिवशी पाहते तर
घरटे रिकामे दिसले.
हुंदके आवरत चिमी म्हणे
न सांगता का जायचे.



# ४. मोर

मोर नाचतो थुई थुई
पिसारा फुलवतो बाई
म्हणून त्याला बघण्याची
मला झाली खूपच घाई.

बाबांनी म्हटले थांब हं.
आई म्हणाली चित्रात बघ
दीदीने फ्रॉक पसरून
पिसारा दाखवला फुलवून.




गंमती आली खूप खूप
मी ही झाले भरपूर खुश
तेव्हा पासून दीदीशी
कट्टी सोडली कायमची.



# ५. युनिफॉर्म

झाडाच्या शेंड्यावर
पोपटांनी घेतली सभा
म्हणाले आपला
युनिफॉर्म हवा.
ठरवून कोणता रंग बरा
पांढरा, पिवळा की निळा
एक होता हुशार
निवडला रंग हिरवागार
कापड आणले छान छान
युनिफॉर्म शिवून तयार

## ६. परीची गोष्ट





चंदेरी झगा
चमचमते पंख
निळ्या महालातून
परी उधळते रंग.

झाडावर हसली फुले
गार गार सुटले वारे
आभाळात पक्ष्यांचे थवे
परीच्या स्वागताला आले.

जादू मंतर छू
साऱ्यांचे दुःख दूर
खाऊसाठी रडणारा दादा
पळत सुटला भूर.

आजीची गोष्ट संपली
दादाचा हट्ट थांबला
छोटी चिमी सुद्धा
पाळण्यातून लागली हसायला.





# ७. खेळ आमचा रंगायचा




चिमणी चिमणी दाणे घे
माझ्याशी खेळायला ये
तुझा माझा दोघींचा
खेळ नाही संपायचा.

पोपट येईल पेरू देईल
कावळा येईल घेऊन जाईल
टकामका बघायचा
खेळ आमचा रंगायचा.

साळुंकी येईल
जांभळे देईल
ओठ लपवून हसायचा
खेळ आमचा रंगायचा.

# ८. कोल्होबांचे वैर



हत्ती, अस्वल,
माकड, ससा,
कोंबडा, बोकड,
मोठा मासा.

साऱ्यांना रांगेत
उभे केले
रविवारची प्रार्थना
म्हणायला सांगितले.

साऱ्यांचे पाठांतर
छानच झाले
कुणीतरी एक
ॲबसेंट राहिले.


कोंबडा ओरडला
कोल्होबा लबाड
अभ्यास चुकवून
बनला द्वाड.

कान देऊन
कोल्होबाने ऐकले
तेव्हापासून कोंबड्याशी
वैरच धरले.

## ९. आपण कोण ?



आट्या पाट्या,
सागरगोट्या
झाडावर मारू
दगड मोठा.



गोल गोल गिरकी
दीदीची फिरकी
उंटदादाची
चालच तिरकी.



अडम् तडम्
तडतड बाजा
खेळातल्या राजाच्या
मोठ्या मिश्या.



घणघण घण
वाजला फोन
हॅलो, मी पिंकी
आपण कोण ?



# १०. चिंगीचा सल्ला

चिंगी, बंगी,
रम्या, रंग्या
छबी, पिंकी,
खट्याळ बब्या.

माझ्या बाहुल्यांचा
नंबर सांगा
एक...दोन...
नाही....तब्बल बारा.


केस विंचरून
दमायला होते.
फ्रॉकना कापड
अपुरे पडते.

पाटी पेन्सील
खर्चाचे काय
अभ्यास घ्यायला
जमेल काय ?

खाऊ वाटताना
भांडतात किती
बब्याच्या वाट्याला
रिकामी पिशवी.

चिंगी बाहुली
म्हणाली काय
दोनच बाहुल्या
घ्यायच्या बाळ.

## ११. चिमणीचे बाळ



झाडावर होते
चिमणीचे घरटे
झोपून असायचे
पिल्लू छोटे.

खिडकीतून मी
रोज बघायची
चिमणी बाळाला
खाऊ भरवायची.

चिमणीचे बाळ
मोठे झाले
घरट्यातच
हलू लागले.


मला फार
गंमत वाटायची
घरट्यावर रोज
नजर ठेवायची.




एके दिवशी
आश्चर्य घडले
चिमणीच्या घरट्यात
कुणीच नाही दिसले.

कान पकडून
आईनं म्हटले
चिमणीचे बाळ
शाळेत गेले.

# १२. चांदोबा



चांदोबाची माझी
शर्यत लागली
धावून धावून
गंमत आली.




मी पळायची
अंगणात
चांदोबा पळायचा
आकाशात.


कधीच नाही
सापडला
डाव माझ्यावर
आला.



एके दिवशी
स्वप्नात आला
गोड गोड
हसून गेला.




# १३. हत्तीदादाचे शेपूट



हत्तीदादाचे शेपूट तुटले
म्हणून त्याला कसेसेच वाटले.

तो म्हणाला बाप्पाला
काहीतरी हवे आपल्याला.

बाप्पाने त्याला सोंड दिली
शेपटाची उणीव भरून काढली.




# १४. दादाने काढला हत्ती

दादाने काढला हत्ती
पाय मोठे कित्ती

सोंड काढली लहान
शेपूट लांब लांब

कान काढले चिमुकले
पोट सुद्धा पिटुकले


दादाला म्हटले असे काय
दादा म्हणतो –
पायावरून ओळखायला काय ?



# १५. पाऊस




आला आला पाऊस
मला नाही ठाऊक
मी झोपून उठले
अगंणात आले.
पाणी पाहून नाचले
पाण्यात खेळू लागले
दादा आला, होड्या सोडल्या
ताई आली, होड्या सोडल्या
साऱ्या होड्या तरंगत
दूरवर गेल्या.




## १६. खार




खार बाई खार
पळते फार
शेपूट हालवत
शोधते काय ?
एवढ्यात आली माऊ
तिने दिला शेंगाचा खाऊ
खारूताईची दोस्ती जमली
रोजच घरात येऊ लागली.



# १७. कपिला




गोठ्यात कपिला
हंबरते
गणूकाकाला
हाक मारते.



गणूला तिची
समजते भाषा
हिरवा हिरवा
देतो चारा.

शेपूट हालवून
नाचू लागते
गणूकाकाशी
दोस्ती वाढते.

# १८. काव काव कावळेदादा



काव काव कावळेदादा
शाळा झाली सुरू आता
पाटी दप्तर उचला बघू.

शाळेची घंटा लागली वाजू
फांदी फांदी पकडून
कावळ्यांनी घेतले बसून
गुरूजी नाही अजून


गप्पा गेल्या रंगून
एक म्हणाला दुसऱ्याला
गुरूजीना नसेल बरे
इथे बसण्यापेक्षा
बघून यावे खरे

काव काव काव
तो उडाला वेगात
सुटली वाटते शाळा म्हणत
सगळे पळाले क्षणात.



३६८२
६/३/२०००


## १९. मनीचे बाळ




मनीचे बाळ
गोजीरवाणे
सगळ्यांनाच
आवडणारे.

खट्याळ मनी
नाठाळ बाळ
त्याचे झाले
भलतेच लाड.

लाल लाल
नाजूक ओठ
शेपटाचा
भलताच झोक.



## २०. पहिले बक्षीस



एक दोन तीन चार
मला खेळ आवडतो फार

तीन चार पाच सहा
गणिताचे नको तास

दहा अकरा बारा
भूगोलातला खारा वारा

तेरा चौदा पंधरा सोळा
परीक्षेचा किती कंटाळा

सतरा, अठरा एकोणीस, वीस
तरीही मिळाले पहिले बक्षीस.



# २१. पुस्तकातला राजा

पुस्तकातला राजा
आमची करतो मजा
पाने परतताना
लपून म्हणतो शोधा.

पुस्तकातला राजा
आमच्याशी बोले खूप
सिंहासनावर बसला तरी
आमची करतो विचारपूस.

पुस्तकातला राजा
असेल मोठा शूर
आमची पिंकी रागावली तरी
फेकून देते त्याला दूर.



# २२. माझे दप्तर




माझे दप्तर
किती मोठे
पाठीला माझ्या
केवढे ओझे.

पाण्याची बाटली
रेनकोट छत्री
रोज नेताना
हात दुखती.

तासामागून तासाची
घंटा वाजते
अभ्यासाचे
ओझे वाढते.

शाळा सुटली
तरी आनंद फसवा
उद्याच्या होमवर्कचा
नंबर आठवा.




## २३. बेडूकदादा



बेडूकदादा बेडूकदादा
किती पिवळे तुम्ही
हळदीलाही लाजवेल
असा रंग आणला कुठून.

बेडूकदादा बेडूकदादा
किती ओरडता डराव डराव
आम्ही गाढ झोपलो तरी
जाग आणता कसे काय ?

## २४. ससा



ससा ससा
भित्रा ससा
तुरू तुरू
पळतो कधी

कान तुमचे
उंच खूप
म्हणून सारे
ऐकू येते.

की भलताच
हट्ट केला
म्हणून आईने
ओढले होते.


# २५. परीक्षा

परीक्षेची चिंता
सर्वांनाच असते
झोपेत सुद्धा
भीती वाटते.

परीक्षेची तयारी
कधी नाही संपत
किती वाचले तरी
काही नाही आठवत.

आयत्या वेळेला
राग येतो स्वत:चा
मग ठरवून टाकते
अभ्यास खूप करायचा.

प्रत्येक वेळी असेच होते
अभ्यास सारा अपुरा राहतो
परीक्षेच्या वेळी घाई होते
मग बाबांकडून पिटाई होते.



BVBK-0403648

# अंजनी प्रकाशन / योगेश प्रकाशन

## यांची दर्जेदार बाल-कुमार वाङ्मय

| | | |
|---|---|---|
| मुलांचा मेवा भाग १ व २ | -पंढरीनाथ रेगे | ३०/- |
| सुबोध कथा भाग १ व २ | - सौ. नलिनी कुलकर्णी | २०/- |
| निवडक बालकथा १ व २ | - दत्तू गोरे | १८/- |
| वादळातील सर्कस | - सरोजिनी वझे | १६/- |
| राष्ट्रसंत तुकडोजी महाराज | -दत्ताजी कुलकर्णी | १०/- |
| विज्ञान परिचय माला : भाग १ ते ४ | | |
| वाहनांची ओळख | - डॉ. भय्यासाहेब ओंकार | ४०/- |
| असे हे जग | - सौ. नलिनी दत्तात्रय | २०/- |
| रंजक गोष्टी | - दत्तू गोरे | १०/- |
| मुलांचे गोष्टीरुप चाणक्य | - श्रीकृष्ण जोशी | १५/- |
| ज्ञान विहार | - पंढरीनाथ रेगे | १२/- |
| धाडशी विश्वास | - एम्. के. बेहेरे | १५/- |
| मनी आणि मोत्या | - रमेश मुधोळकर | १०/- |
| गाडगे महाराजांच्या गोष्टी | - सुबोध मुजुमदार | १०/- |
| जगातील कुतुहल | - डॉ. भय्यासाहेब ओंकार | १५/- |
| भारतीय कला | - डॉ. भय्यासाहेब ओंकार | १५/- |
| पुस्तकांची पेटी | - मदन हजेरी | १५/- |
| परिकथा-लोककथा | - पंढरीनाथ रेगे | १५/- |
| रानमेवा | - बाबुराव शाळीग्राम | १५/- |
| ज्ञानसूर्य | - रूपाग्रज | १२/- |
| विविध शालेय उपक्रम | - डॉ. भय्यासाहेब ओंकार | १५/- |
| वहाने एक वरदान | - डॉ. भय्यासाहेब ओंकार | १५/- |

एकमेव वितरक अंजनी प्रकाशन

बी/१६/८ इंदिरा नगर, पुणे ३७.